**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २५/०४/२०१८

**कर्जबाजारी झाल्यामुळे विंचुर येथील व्यापा-याने केला रोकड लंपास झाल्याचा बनाव**
**स्थानिक गुन्हे शाखा व लासलगाव पोलीसांची संयुक्त कारवाई**

---

दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारचे सुमारास पाचोरे बु।।, विंचुर, ता.निफाड येथील शेतीमालाचे व्यापारी राहुल शंकर सानप यांनी ॲक्सिस बॅंक शाखा लासलगाव येथुन ०९ लाख रूपये काढुन ते बॅगमध्ये ठेवले, व सदर बॅग त्यांचेकडील स्विफ्ट कारचे पुढील सिटवर ठेवुन विंचुरकडे जात असतांना त्यांना गाडीचे चाक पंक्चर झाले असे वाटल्याने गाडी उभी करून खाली उतरले, त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन आरोपीतांपैकी एकाने गाडीचा पुढील दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी राहुल सानप यांनी विरोध केला तेव्हा दुस-या आरोपीने त्यांचे डोळयात मिरचीची पुड फेकुन गाडीचे सिटवरील ०९ लाख रूपये असलेली बॅग लंपास केली. सदर घटनेबाबत **लासलगाव पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ५३/२०१८ भादवि कलम ३९४** प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटनेचे निषेधार्थ लासलगाव बाजार समितीत व्यापा-यांनी मंगळवार दि. २४ एप्रिल रोजी लासलगाव व विंचुर बाजार समितीचा व्यवहार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सदर घटनेबाबत व्यापारी वर्गामध्ये खळबळ उडाली होती, दरम्यान घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयात तात्काळ नाकाबंदी करण्याचे आदेश दिले, व सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेसाठी तपास पथकांना सुचना दिल्या. त्यानुसार निफाड उपविभागाचे **पोलीस उपअधीक्षक श्री. दिपक गि-हे**, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** व लासलगाव पो.स्टे.चे सहा.पोलीस निरीक्षक **श्री. जनार्दन सोनवणे** यांनी सदर गुन्हयाचे तपासात घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पडताळणी करून संशयीत आरोपीतांचा माग काढणेबाबत पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना रवाना केले.

दिनांक २४ एप्रिल २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखा व लासलगाव पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी हे सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना, सदर गुन्हयातील फिर्यादी नामे राहुल शंकर सानप, रा. पाचोरे बु।।, ता.निफाड यांनी घडलेले घटनेचे सांगितलेले हकिगतीप्रमाणे घटनास्थळावरील व बॅंकेचे आजुबाजूचे परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली असता, दोन इसम संशयीतरित्या फिरत असल्याचे निदर्शनास आले. तसेच फिर्यादी राहुल सानप यांचेकडे सदर घटनेबाबत सखोल चौकशी केली असता, त्यांनी सांगितलेली हकिगत व सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील हालचाली यांचेत विसंगती आढळुन आल्याने पोलीसांचा संशय बळावला. त्यावरून फिर्यादी राहुल सानप यांना विश्वासात घेवुन तपासाचे कला-कौशल्य वापरून विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे इतर दोन नातेवाईकांसह बॅंकेतुन काढलेले ०९ लाख रूपये चोरीस गेले असल्याचा बनाव केला असल्याची कबुली दिली आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी राहुल शंकर सानप हे शेतीमालाचे व्यापारी असुन त्यांचेवर मर्चंट बॅंक व व्यापा-यांचे कर्ज होते. त्यांनी दि.२३ एप्रिल रोजी लासलगाव येथील ॲक्सिस बॅंकेतुन धनादेशाने ०९ लाख रूपये काढले होते, परंतु कर्जबाजारी झाल्याने सदरचे पैसे चोरी झाल्याचा बनाव करण्याचा प्लॅन फिर्यादी राहुल सानप यांनी केला होता. सदर कटात त्यांचेसोबत त्यांचा मावस भाउ नामे **अभिजीत भाउसाहेब सानप**, रा. निमगाव, ता.सिन्नर व साथीदार नामे **रमेश नामदेव सानप**, रा. पाचोरे बु।।, ता.निफाड हे सामील होते.

सदर गुन्हयातील फिर्यादी राहुल सानप यांनी बॅंकेतुन काढलेले पैसे चोरीस गेले असल्याचा बनाव करण्यासाठी, त्यांनी सोमवारी दि. २३ एप्रिल रोजी ॲक्सिस बॅंकेतुन ०९ लाख रूपये काढले व गाडीचे पुढील सिटवर ठेवले, विंचुर रोडने पुढे जात असतांना गाडीचे टायर पंक्चर झाले असल्याचे बहान्याने ते खाली उतरले, व सदर ठिकाणी त्याचा मावस भाउ अभिजीत यास पल्सर मोटर सायकलवर येण्यास सांगितले, तसेच त्याचेकडे मिरचीची पुड देवुन गाडीजवळ आल्यावर झटापट करून मिरचीची पुड डोळयात टाकायची व गाडीचे सीटवरील पैशांची बॅग लुटमार करून घेवुन जायची, तसेच साथीदार रमेश याने घटना घडलेनंतर त्यास दवाखान्यात घेवुन जायचे असे ठरले प्रमाणे त्याचा मावस भाउ अभिजीत याने फिर्यादी राहुल याचे डोळयात मिरचीची पुड टाकली व गाडीचे पुढील सिटावरील पैशांची बॅग लुटली आहे, तसेच साथीदार रमेश याने ठरलेप्रमाणे फिर्यादीस दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी याने कर्जबाजारी झाल्यामुळे पैसे चोरी गेल्याचा बहाना करून त्यांचे कुटूंबियांची फसवणुक केली आहे, तसेच यातील फिर्यादीचा मावस भाउ अभिजीत सानप यास फिर्यादीकडुन ०२ लाख रूपये घेणे असल्याने त्यास कटात सामील करून पैसे परत देणार असल्याचेही सांगितले आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी **१) राहुल शंकर सानप**, वय २८, रा. पाचोरे बु॥, ता.निफाड, **२) अभिजीत भाउसाहेब सानप**, वय २६, रा. निमगाव, ता.सिन्नर, **३) रमेश नामदेव सानप, वय २७**, रा. पाचोरे बु॥, ता.सिन्नर यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे **कब्जातुन चोरीस गेलेले ०८ लाख रूपये हस्तगत** करण्यात आले आहे. जप्त मुद्देमाल व संशयीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी लासलगाव पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे,** लासलगाव पोलीस ठाण्याचे **सपोनि श्री. जनार्दन सोनवणे,** सपोनि श्री. अशिष आडसुळ स्थागुशा, पोउनि डी.एस.मुढे लासलगाव पो.स्टे. तसेच स्थागुशाचे सपोउनि रविंद्र शिलावट, जिवराज इलग, पोहवा भगवान निकम, पोना नंदु काळे, राजु सांगळे, पोकॉ संदिप लगड, लासलगाव पोलीस ठाण्याचे सपोउनि जोपुळे, पोना महाजन, शिंदे, पोकॉ आजगे अशांचे पथकाने सदर जबरी चोरीचे गुन्हयाचा उलगडा करून वरील आरोपीतांना ताब्यात घेतले आहे.